**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**

**१५ वा वित्त आयोग**

**हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना,**

**अहिल्यानगर महानगरपालिका**

**क्षेत्रा करिता रिक्त पदांवर कंत्राटी पदभरती**

## पदभरती

रष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वित्त आयोगा व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रा मधील आरोग्य केंद्राकरिता कंत्राटी पद्धतीने थेट मुलाखत (Walking Interview) पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी / अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी पद भरती करिता अर्ज मागविण्यात येत आहे या साठी सविस्तर माहिती व विस्तृत जाहिरात अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वेबसाईट www.amc.gov.in या संकेत स्थळावर व आरोग्य विभाग, जुनी महानगरपालिका माळीवाडा, नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर पदांकरिता ईच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज मा. आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या नावे विहित नमुन्यात अर्ज जाहिरातीमध्ये नमुद पत्त्यावर आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १७/०३/२०२६ रोजी सादर करावे.

- ठिकाण - आरोग्य विभाग, जुने मनपा कार्यालय, माळीवाडा, अहिल्यानगर महानगरपालिका
- अर्ज स्वीकारण्याची वेळ - सकाळी ११ ते दुपारी १
- अर्ज छाननी वेळ - दुपारी १ ते ३
- प्रत्यक्ष मुलाखतीची वेळ - दुपारी ३ वाजता

(मा.श्री.यशवंत डांगे)
आयुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका

# कंत्राटी पदभरती जाहीरात राष्ट्रीय आरोग्य अभियान

राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वित्त आयोगा व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, अतंर्गत अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

| अ.क्र | पदनाम | रिक्त पद (बिंदूनामावली निहाय) | शैक्षणिक पात्रता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकार(15 वा वित्त आयोग) | एस सी - १<br>विजाआ - 1<br>ओ बी सी -१<br>ई डब्लू एस - . १<br>खुला-१<br>एकूण - ०५ | एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस. उमेदवार प्राप्त न झाल्यास बी.ए.एम.एस. उमेदवार | रु.६०,०००/-<br>रु.२५,०००/- + रु.१५,०००/- Performance Base Incentive |
| २ | अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी (NUHM) | 1 (सामाजिक आरक्षण लागू नाही) | एम.बी.बी.एस. | रु.३०,०००/- |
| ३ | पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी (हिंदू हृदय बाळासाहेब टाकरे आपला दवाखाना) | एस.सी – 1<br>खुला – 1<br>एकूण -02 | एम.बी.बी.एस.<br>एम.बी.बी.एस. उमेदवार प्राप्त न झाल्यास बी.ए.एम.एस. उमेदवार | रु.६०,०००/-<br>रु.२५,०००/- + रु.१५,०००/- Performance Base Incentive |
| ४ | पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी(NHUM) | -वि जा - 1<br>एकूण -१ | एम.बी.बी.एस. | रु.६०,०००/- |
| ५ | विषयतज्ञ (Polyclinic) | 1) Physician(medicine) - ३<br>2) Obstetrics and Gynecologist - १<br>3) Pediatrician. - २<br>4) Ophthalmologist - 4<br>5) Dermatologist. - ३<br>6) Psychiatrist - 4<br>7) ENT specialist - 4<br>एकूण - २१ | 1) MBBS (MD Medicine DNB)<br>2) MBBS (MD/MS/GYN/DGO /DNB)<br>3) MBBS (MD PEDIATRICIAN/DCH/ DNB)<br>4) MBBS (MD OPHTALMOLOGIST/ DOMS<br>5) MBBS /MD (SKIN/VD) DVD DNB<br>6) MBBS /MS PSYCHIARTY DPM/DNB<br>7) MBBS / MS (ENT/DORL/DNB) | TO VISIT ONCE IN EVERY WEEK RS-2000/- TO BE PAID FIXED AMOUNT PER VISIT + RS-100/- PER PATIENT CHECKED OF HIS/HER SPECIALIST TO MAXIMUM RS-5000 VISIT. |

१) अर्ज दिलेल्या नमुन्यात परिपुर्ण भरलेला असावा. अर्जामध्ये माहिती अपूर्ण असल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. याबाबत असलेली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा, नियम लागू नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) उपरोक्त कंत्राटी पदाकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

४) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. शासकीय निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

५) वैदयकीय अधिकारी या पदाकरीता एम.बी.बी.एस उमेदवारा प्राप्त न झाल्यास बी.ए.एम.एस उमेदवारास संधी देण्यात येईल मात्र त्यानंतर आठवडयाच्या दर मंगळवारी घेण्यात येणा-या भरती प्रक्रिया मध्ये एम. बी. बी.एस उमेदवार प्राप्त झाल्यास ज्या अनुषगाने उमेदवार प्राप्त होईल त्या अनुषेशामधील बी. ए.एम.एस उमेदवाराची नियुक्ती रदद करण्यात येईल.

६) एकापेक्षा अधिक पदा करीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

७) निवड यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमानुसार प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

८) राखीव प्रवर्गातील उमेदवार न मिळाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

९) वैदयकीय अधिकारी पदासाठी वयोमर्यादा ७० वर्ष, रुग्ण सेवेशी संबंधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष वय वर्ष ६० नंतर अर्ज करणा-या उमेदवारांनी शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांचे स्वाक्षरीने सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल. उपरोक्त पदांसाठी भरतीबाबत मुलाखत प्रक्रिया राबविण्यात येईल तसेच खालील प्रमाणे गुणांकन करण्यात येईल.

थेट मुलाखती

1) Subject Knowledge (10)
2) Research & Academic Knowledge (10)
3) Leadership Quality (10)
4) Administrative Abilities (10)
5) Experience (10)

a) For Govt. Experience -2 Marks for one year

b) For Private Experience-1 Marks for one year Total Experience-10 Marks Maximum एकूण गुण -५०

१०) अ.क्रं. १ पदांकरीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्तः विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजु झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्त नंतर देय असलेले वेतन पेन्शन याबाबतची संपूर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

११) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करून गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल किंवा निवड समितीने घेतलेल्या निर्णयानुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल त्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी, अहिल्यानगर महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
| --- | --- | --- |
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढाचे (उदा ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion 60*50/100=30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विभारात घ्यावी | अधिकतम २० गुण द्यावेत . मिळालेल्या ऐकून गुणांच्या ताकेवारीचे २० प्रमाणे | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण दयावेत (१ वर्षाकरीता ६ गुण जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | एकूण | १०० गुण |

१२) उपरोक्त पदभरती करिता तत्सम कोन्स्लिंग रजिस्ट्रेशन जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

१३)पदभरती प्रक्रिया रद्द करणे/ स्थगित करणे/पदांची संख्या कमी जास्त करणेबातचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी अहिल्यानगर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही

१४)दोनपेक्षा अधिक हयात मुले असणा-या उमेदवारांचे अर्ज पात्र केले जाणार नाही. सोबत जोडण्यात आलेला नमुना भरुन अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१५) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज मा आयुक्त तथा अध्यक्ष, शहर आरोग्य सोसायटी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर यांचे नाव आरोग्य विभाग जुनी महानगरपालिका यतिम खाना समोर, माळीवाडा अहिल्यानगर येथे दि. १७/०३/२६ रोजी दुपारी १.०० वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१६) सदरहून भरती अर्जाची छाननी, लेखी परिक्षा/मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या संकेत स्थळासह प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च व्यक्तीशः दुरध्वनी / ई-मेल अथवा वर्तमानपत्रात जाहीरात दिली जाणार नाही.

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका, २) जातीचे प्रमाणपत्र, ३)शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला (Leaving / Tc Certificate), (Medical Counselling Registration Certificate ४) शासकीय अनुभव असलेले प्रमाणपत्र, ५) नमुना अर्जात संपूर्ण माहिती.

(डॉ. सतिश राजूरकर)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
तथा सदस्य सचिव,
शहर आरोग्य सोसायटी

(श्री.नागेंद्र मुतकेकर)
~~अतिरिक्त आयुक्त~~ तथा सदस्य
शहर आरोग्य सोसायटी
अहिल्यानगर महानगरपालिका

(मा.श्री.यशवंत डांगे)
आयुक्त तथा अध्यक्ष
शहर आरोग्य सोसायटी
अहिल्यानगर महानगरपालिका

O.C
PHM
13/03/26